पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/०१/२०१९** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक – **०३/०१/२०१९** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.उषा संजोग वाघेरे – पाटील
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.गावडे – प्र.अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राजन पाटील – सह शहर अभियंता, मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.पुजारी – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) मा.शहर सुधारणा समितीच्या अधिकारात वाढ करणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) भारतीय संविधान प्रास्ताविका शिलालेख उभारणेबाबत – मा.सुलक्षणा धर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

**----------**

मा.सुरेश भोईर – दिनांक १२/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) चा सभावृत्तांत कायम करतांना विषय क्रमांक २ चा विचार “ पुढील सभेच्या वेळी ” ऐवजी “ दिनांक ०९/०१/२०१९ ” च्या सभेच्यावेळी करणेत यावा याप्रमाणे दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा

मा.सभापती – दिनांक १२/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) चा सभावृत्तांत कायम करतांना विषय क्रमांक २ चा विचार “ पुढील सभेच्या वेळी ” ऐवजी “ दिनांक ०९/०१/२०१९ ” च्या सभेच्यावेळी करणेत यावा याप्रमाणे दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मासभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०३/०१/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत..

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०३/०१/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे स.नं.७३,७४,७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी.रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०३/०१/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/२२४/२०१८, दि.१६/१०/२०१८

विषय : मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ मधील २४ मी.रस्ता रद्द करणेकरिता महाराष्ट्र शासन प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०३/०१/२०१९

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.सुरेश भोईर, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समितीचे अधिकार मा.सर्वसाधारण सभेने कमी केलेले आहेत. सदर समितीचे अधिकारात वाढ करणेसाठी मा.सहा.आयुक्त, झो.नि.पु. यांनी इतर मनपा मधील शहर सुधारणा समितीचे अधिकार या बाबतची माहिती घेऊन शहर सुधारणा समितीकडे कोणते अधिकार असावेत या बाबतचा अहवाल १ महिन्यात समितीपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०३/०१/२०१९

सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ : मा.सुलक्षणा धर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –

आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आखत्यारीत येत असलेल्या सर्व शाळांच्या मैदानात, उद्यानात, दवाखान्यात, प्रशासकीय इमारतीत भारतीय संविधान प्रास्ताविक शिलालेख उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**सीमा दत्तात्रय चौगुले**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/०९/२०१९
दिनांक : ०४/०१/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.